**International Journal of Research in Economics and Social Sciences (IJRESS)**
Available online at : http://euroasiapub.org
Vol. 6 Issue 11, November - 2016, pp. 404~415
ISSN(o): 2249-7382 | Impact Factor: 6.225 | Thomson Reuters ID: L-5236-2015

# सामाजिक संस्था, संस्थाकरण आणि सामाजिक पुनर्निर्माण

**डॉ. रविन्द्र नारायणराव मुन्द्रे**

*इतिहास विभाग प्रमुख,*
*श्रीमती राधादेवी गोयनका महिला महाविद्यालय, अकोला*

**सारांश –**

भारतीय समाजरचनेत दोन घटक दिसून येतात, पहिला म्हणजे शोषक व दुसरा म्हणजे शोषीत. या घटकांमध्ये शोषक हा प्रस्थापित आहे तर शोषित विस्थापित. या दोघांमध्ये प्राचीन काळापासून संघर्ष चालत आलेला आहे. या संघर्षाला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बुद्धवाद आणि ब्राह्मणवाद यांच्यातील संहारात्मक संघर्ष असे म्हटले आहे. यामध्ये कधी बुद्धवाद हरतो तर कधी ब्राह्मणवाद जिंकतो. यालाच बाबासाहेबांनी क्रांती आणि प्रतिक्रांतीचा इतिहास असेही म्हटले आहे. सामाजिक पुनर्निर्माणासाठी क्रांतीची गरज असते. त्यासाठी सामाजिक संस्थेच्या माध्यमातून सामाजिक संस्थाकरण गरजेचे असते .

**मूळशब्द –** डॉ. बाबासाहेब आंबेडकर, सामाजिक संस्था, संस्थाकरण.

**प्रस्तावना –**

शोषीत–पीडीत समाजाच्या विद्यमान धार्मिक, सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, राजकीय आणि शैक्षणिक अशा कुठल्याही क्षेत्राचे आज अवलोकन केल्यास, निराशाजनक चित्र आढळून येईल. परिणामतः हा समाज अनेक समस्यांच्या आवर्तात सापडून संपूर्णतः निराशाग्रस्त झालेला दिसतो. या समाजात कृतिकार्यक्रमाचा (Action Plan) प्रकर्षाने अभाव जाणवत आहे. याउलट प्रस्थापित समाज अव्याहतपणे आपले कृतिकार्यक्रम राबवून शोषीत–पीडीत समाजाला त्यावर केवळ 'प्रतिक्रिया' (Reaction) देण्यासाठी भाग पाडीत आहे. फलस्वरूप हा समाज दिवसेंदिवस 'प्रतिक्रियावादी' (Reactionary) होत चालला आहे. आणि समाजशास्त्राच्या सिद्धांतानुसार जो समाज केवळ प्रतिक्रियांच्या भरवश्यावर जगत असतो तो जिवनकलहात टिकाव धरू शकत नाही. म्हणून आज या समाजाचे अस्तित्व धोक्यात आले आहे. अनेक समस्यांनी ग्रासलेल्या या समाजाची खऱ्या अर्थाने आज 'नैराश्य' (Frustration) ही एकमेव मूळ समस्या आहे. आणि त्यातूनच अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत.

मॅथ्यू अरनॉल्ड यांनी केलेली नैराश्याची परिभाषा मांडतांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, 'स्वतःमधील स्वत्व हरवून बसणे म्हणजे नैराश्य होय'.[1] मनुष्य स्वतःमधील स्वत्व का हरवून बसतो याची कारणमीमांसा करतांना ते म्हणतात 'शोषीत–पीडीत समाजामध्ये शारीरिक आणि मानसिक धनावस्थेचा अभाव (Lack of plus conditions of body and mind) असल्यामुळे ते वैफल्यग्रस्त झालेले आहेत. 'हिंदु समाज व्यवस्थेने निर्माण केलेल्या प्रतिकूल सामाजिक पर्यावरणामुळे हे वैफल्य निर्माण झाले आहे.'[2]

यावर उपाय सुचवितांना बाबासाहेब ठामपणे सांगतात की, शोषीत–पीडीत समाजाची शारीरिक आणि मानसिक अवस्था धनावस्थेमध्ये परिवर्तित करण्यासाठी अनुकूल सामाजिक पर्यावरण निर्माण करणे अत्यंत गरजेचे आहे व त्यासाठी ज्या हिंदु समाजव्यवस्थेने हे प्रतिकूल वातावरण निर्माण केलेले आहे ती व्यवस्था बदलविणे क्रमप्राप्त आहे. अर्थातच, व्यवस्था परिवर्तन हाच एकमेव उपाय असून त्यासाठी व्यवस्था परिवर्तनाची चळवळ गतिमान करणे अपरिहार्य आहे असा सल्ला ते देतात.

**सामाजिक परिवर्तनाच्या चळवळीसाठी तीन आवश्यक बळ :–**

कुठलीही सामाजिक परिवर्तनाची चळवळ गतिमान करण्यासाठी 'संघर्ष' हा अनिवार्य असतो. त्यासाठी जोखीम पत्करण्याची व धाडसाची गरज असते. (Imagination and love of adventure) त्याशिवाय समाज गतिशील होऊ शकत नाही. उलट या दोन्हीचा अभाव

असलेला समाज स्थितीशील आणि जडवत होत असतो. आणि म्हणून संघर्ष, जर विनाशकारी आणि अमानुष प्रकारचा नसेल तर तो समाजाच्या प्रगतीसाठी अत्यंत आवश्यक असतो.

अर्थातच अशा संघर्षासाठी 'सक्रियता' (Activity) ही आवश्यक बाब असते. कारण 'सक्रियता ही विकासाची पहिली अट असते. ती समाजाला विकासाकडे नेते, तर 'निष्क्रियता' हे मृत्यूचे दुसरे नांव असते.'[3] सक्रियता आणि संघर्षामधूनच परिवर्तनाची चळवळ आकार घेत असते.

अशी चळवळ उभारण्यासाठी बाबासाहेबांच्या मते तीन बळ आवश्यक असतात. मनुष्यबळ, मानसिकबळ आणि द्रव्यबळ हे ते तीन बळ होत. मनुष्यबळ म्हणून बाबासाहेबांना 'बुद्धिजीवी वर्ग' (Intellectual class) अपेक्षित होता. बुद्धिजीवी वर्गाच्या निर्मितीसाठी म्हणूनच त्यांनी प्रथम सुशिक्षित वर्गाची (Educated class) निर्मिती केली. या सुशिक्षित वर्गावर प्रक्रिया करुन बुद्धिजीवी वर्ग निर्माण करण्याची त्यांची मनिषा होती.

"There is a world of difference between one who is learned and one who is an intellectual. The former is class conseious and is alive to the interest of his class only. The latter is an emancipated being who is free to act without being swaged by class consideration.[4]

चळवळीचे दुसरे आवश्यक बळ म्हणजे 'मानसिक बळ' जे मनुष्याला चळवळीसाठी सक्रीय आणि संघर्षरत करित असते. 'आंतरिक चेतना' (Impulses) मानसिक बळ निर्माण करते. आंतरिक चेतनेमध्येच कर्म करण्याचे स्त्रोत असतात. कारण त्याच्यामध्ये कर्म करण्याचा काही जन्मजात प्रवृत्ती असतात. बाह्य परिस्थिती मनुष्याला कार्य करण्याची प्रेरणा देत नाही. ती केवळ त्या कार्यांना पुर्तदिशा प्रदान करते.[5] 'आंतरिक चेतना ही जिवनाची अभिव्यक्ती (लक्षण) असते (Impulses in the expression of life) आणि ज्या ठिकाणी ही अभिव्यक्ती असते त्या ठिकाणी आपला जीवनमार्ग मृत्यूकडे न वळता जीवनाकडे वळण्याची आशा असते. परंतु आंतरिक चेतनेचा अभाव म्हणजे मृत्यू होय आणि मृत्यूमधून कोणतेही नवजीवन प्राप्त होऊ शकत नाही.'[6]

या आंतरिक चेतनेमधूनच कार्य करण्याचे स्त्रोत निर्माण होतात व हे स्त्रोत मनुष्याला कार्य करण्याची प्रेरणा प्रदान करून त्याला संघर्षासाठी प्रवृत्त करतात. यातूनच मग चळवळीसाठी आवश्यक असलेले 'मानसिक बळ' निर्माण होते. एकदा हे 'मनुष्यबळ' आणि 'मानसिक बळ' निर्माण झाले की या दोहोंच्या संयोगाने आपोआप 'द्रव्यबळ' निर्माण करणारी यंत्रणा निर्माण होते व या प्रक्रियेमधूनच सामाजिक परिवर्तनाची चळवळ गतिमान होते.

अर्थातच अशी चळवळ आपसूख निर्माण होत नाही. त्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी तीन आवश्यक बाबी सुचविल्या आहेत. ''पहिली म्हणजे त्यासाठी आपल्या नागरिक अधिकारांना प्राप्त करणारी चळवळ (Movement) असली पाहिजे. दुसरी आवश्यक बाब म्हणजे अशी चळवळ राबविण्यासाठी मध्यवर्ती संस्था निर्माण करणे. (Agency to be employed) आणि तिसरी व अत्यंत महत्त्वाची बाब म्हणजे अशी संस्था संचालित करण्यासाठी सामाजिक कार्यकर्त्यांची अफाट फौज निर्माण करणे होय. (To employ large army of social workers to carry out its programmes) अर्थातच हे कार्य भाडोत्री कार्यकर्त्यांच्या (Paid workers) साहाय्याने होऊ शकत नाही. त्यासाठी समर्पित कार्यकर्ते (Missionary workers) आवश्यक आहेत. या कार्यासाठी सामाजिक कार्यकर्त्यांची अशी यंत्रणा हवी की ज्यांनी स्वतःला एक आणि फक्त एकाच कार्यासाठी वाहून घेतले आहे. (What is wanted in agency is singal minded devotion to one task and one task only)[7]

**समाजाचे संस्थाकरण (Institutionalization of the Society) :–**

व्यवस्था परिवर्तनाच्या चळवळीला गतिमान करण्यासाठी आणि सामाजिक पर्यावरण अनुकूल करण्यासाठी समाजाला एका विशिष्ट प्रक्रियेमध्ये टाकावे लागते. या प्रक्रियेला समाजशास्त्रामध्ये 'समाजाचे संस्थाकरण करणे' असे म्हणतात.

व्यक्ती ह्या स्वभावतःच स्वैराचारी प्रवृत्तीच्या असतात. सामाजिक निर्बंधामुळे आपल्या स्वातंत्र्याची गळचेपी होत आहे, असा त्यांचा ग्रह झालेला असतो व म्हणून कुणाच्याही बंधनात राहणे त्यांना आवडत नाही. परिणामतः व्यक्तिगत स्वातंत्र्याचा अतिरेक होऊन स्वैराचारी प्रवृत्ती वाढीस लागते व समाजात बजबजपुरी माजून अराजकता पसरते. त्यामुळे समाजाचे एकूणच स्वास्थ धोक्यात येते. अशावेळी अशा प्रवृत्तीवर निर्बंध लादून तिला नियंत्रणात ठेवणे गरजेचे असते. अर्थातच हे अत्यंत कठीण काम असते. उदा. कुटुंब. कुटुंबाचे कल्याण आणि प्रगती व्हावी म्हणून ते कुटुंब आपल्या नियंत्रणात असावे, असे प्रत्येक कुटुंबप्रमुखाला वाटते. त्यासाठी तो सर्वप्रथम आपल्या कुटुंबातील सर्व सदस्यांचे संगोपण व संवर्धन करतो. त्यांच्या आरोग्याची व शिक्षणाची उचित व्यवस्था त्याला करावी लागते. या कुटुंबाचे नियमन करून त्यांचे नियंत्रण करणे त्याला शक्य होते. एकप्रकारे ही कुटुंबाच्या संस्थाकरणाचीच प्रक्रिया असते.

समाजाचेही असेच असते, 'समाजातील अराजकता टाळण्यासाठी व त्याला प्रगतीपथावर नेण्यासाठी त्या समाजातील व्यक्ती आणि समूहाचे नियमन करून त्यांच्यावर नियंत्रण प्रस्थापित करणे गरजेचे असते. त्यासाठी समाजाचे सर्वप्रथम संगोपन व संवर्धन करणे अपरिहार्य असते. त्या समाजाला उचित प्रशिक्षण देऊन संस्कारीत करावे लागते. त्यासाठी उचित

संस्काराची यंत्रणा उभी करावी लागते. या प्रक्रियेमधूनच शिस्तबद्ध आणि नितीमान समाज घडत असतो. असा समाज नैराश्याच्या गर्तेतून मुक्त होऊन आपल्या समाजातील समस्यांचे निराकरण करण्यासाठी समर्थ होतो आणि जीवन कलहामध्ये टिकाव धरण्यासाठी समर्थ होतो. समाजशास्त्राच्या दृष्टीने ही संस्थाकरणाची प्रक्रिया असते.'[8]

ही प्रक्रिया नवीन नसून, पूर्वापार चालत आलेली प्रक्रिया आहे. 'पूर्वी ही प्रक्रिया प्रत्येक गावखेड्यात आणि वस्ती मोहल्यात 'गावपंचायती' मार्फत राबवली जायची. ह्या पंचायती त्या गावातील आणि मोहल्यातील सर्व व्यक्तींचे आणि समूहाचे संगोपन आणि संवर्धन करायच्या. त्यांच्या हितासाठी पोषक असलेले सामाजिक नियम तयार करून त्यांची अंमलबजावणी करायच्या. त्या माध्यमाने समाजाचे नियमन आणि नियंत्रण व्हायचे. ज्यांनी या नियमांची पायमल्ली केली त्यांना उचित दंड आणि शिक्षा ठोठावणारी 'दंड प्रणाली' सुद्धा यावेळी प्रकाशित झाली होती. त्यामूळे वेळोवेळी या पंचायतीचा दबदबा निर्माण झाला होता. या भीतीपोटी समाजातील प्रत्येक व्यक्ती सामाजिक नियमांचे काटेकोरपणे पालन करीत होते. त्यामुळे त्यावेळचा समाज स्वैराचार आणि अराजकता यापासून भयमुक्त होता व सुखासमाधानाने नांदत होता.'[9]

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी या प्रक्रियेलाच 'व्यक्तीचे सामाजिकरण' (Socialization of Individuals) असे संबोधले आहे. या प्रक्रियेमुळे प्रत्येक व्यक्ती संस्थेने ठरवून दिलेल्या नियमाबरहुकूम वर्तन करतो. त्यांच्या व्यक्तिगत नियमाप्रमाणे तो आचरण करीत नाही. त्या समाजातील मान्यताप्राप्त संस्था व्यक्तीचे परस्परसंबंध निश्चित करीत असते. म्हणजे व्यक्तीचे संबंध संस्थाबद्ध असतात. या आधारावर 'व्यक्तीचे आणि समूहाचे परस्परसंबंध संस्थाबद्ध करणे म्हणजे समाजाचे संस्थाकरण करणे होय.' अशी संस्थाकरणावर सूटसूटीत व्याख्या करता येईल. बाबासाहेबांच्या मते संस्थाकरणाच्या प्रक्रियेमूळे सामाजिक पुर्ननिर्माण (Social Reconstruction) सहज शक्य होते.[10]

**संस्थाकरणाची प्रक्रिया (Process of Institutionalization) :–**

सामाजिक नियमांच्या माध्यमाने समाजाच्या संस्थाकरणाची प्रक्रिया क्रियान्वित केली जाते. सामाजिक नियमातूनच कोणत्याही समाजाच्या प्रथा, रूढी व परंपरा आकार घेत असतात. परंतु हे सामाजिक नियम अस्तित्वात येण्यासाठी सुद्धा विशिष्ट प्रक्रियेतून जावे लागते.

सर्वप्रथम विशिष्ट व्यक्तीच्या मनात एखादा विचार उद्‌भवतो. या विचाराचा अनुषंगाने त्या व्यक्तीचे वर्तन घडत असते व त्याविषयीची त्याची व्यक्तिगत भूमिका तयार होते. या भूमिकेच्या अनुषंगाने त्या व्यक्तीची सवय बनते. या व्यक्तीच्या अशा अनेक सवयीचा व त्यासंबंधीच्या त्यांच्या भूमिकेचा संग्रह होऊन त्याचे संकलन केल्या जाते. अशा अनेक व्यक्तींच्या

सवयीच्या व भूमिकांच्या संग्रहातून विशिष्ट समूहांच्या सवयी निर्माण होतात व त्या सवयीच्या अनुषंगाने त्या समूहाच्या त्याविषयीच्या भूमिका निर्माण हो़ऊन त्यांचा संग्रह केल्या जातो. व या संग्रहाच्या अनुषंगाने त्या विशिष्ट समूहाचे वर्तन घडते. या विशिष्ट समूहाच्या वर्तन विषयक भूमिकांना जेव्हा सामाजिक हेतू प्राप्त होतो तेव्हा त्यातूनच सामाजिक नियम तयार होतात. पूढे या सामाजिक नियमांच्या माध्यमातून त्या समाजाच्या वर्तन विषयक रूढी, प्रथा आणि परंपराच समाजाचे संस्थाकरण करतात.

या संबंधात डॉ. आंबेडकर म्हणतात की, 'संघटीत गटात एका व्यक्तिला दुसया व्यक्तीच्या संदर्भात काही विशिष्ट हक्क व कर्तव्ये असतात. गटातील व्यक्तींचे परस्पर संबंध व त्या व्यक्तींचे गटांशी संबंध हे सामाजिक नियमांनी नियत होत असते. पूढे ते म्हणतात की, ' जेथे जेथे माणसाचे गट असतात तेथे गटाला सामाईक असणारे कृतीचे काही मार्ग असतात म्हणजेच लोकरिती. गटाला सामाईक असणारे मान्यताप्राप्त कृतीचे काही मार्ग असतात आणि ते एका पीढीपासून दुसऱ्या पीढीला दिले जातात. अशा मान्यताप्राप्त कृतीच्या मार्गाला चालीरिती वा नैतिक आचार म्हणतात. त्याचे पालन करणे हे प्रत्येक व्यक्तींचे कर्तव्य असते आणि जर तो त्याच्या विसंगत वागला तर त्याला गटाच्या नापसंतीची जाणीव करून देण्यात येते![11] संस्थाकरण करण्याच्या दृष्टिने प्रथा, रुढी आणि परंपरा यांचे अनन्यसाधारण महत्त्व असते. प्रथा राज्याच्या कायद्यापेक्षाही प्रभावी असतात. बाबासाहेबांच्या मते, कायद्याच्या तुलनेत प्रथा सुद्धा नगण्य स्वरुपाच्या नसतात. राज्य कायद्याला पोलीस बळाच्या माध्यमाने जेवढया परिणामकारक पद्धतीने लागू करते त्यापेक्षा अधिक परिणामकारक पद्धतीने जनसमूह प्रथांना लागू करते. याचे कारण असे की, संघटीत जनसमूहाची बाह्यकारी शक्ती ही राज्याच्या बाह्यकारी शक्तीपेक्षा अधिक प्रबळ असते.... अशा परिस्थितीत प्रथांचे बळ हे सर्वस्वी असते. समाजातील प्रत्येक समूहाच्या वर्तनविषयक काही सवयी असतात. त्या समूहाच्या मानसिक प्रवृत्तींचे अविभाज्य अंग असतात. प्रत्येक नवागंतुक मग तो समाजामध्ये जन्मामुळे वा अंगिकृत केल्यामुळे सामील झालेला असो, तो या सामाजिक प्रक्रियेच्या माध्यमातूनच समाजामध्ये दाखल झालेला असतो. प्रत्येक समूहामध्ये ही प्रक्रिया निरंतर स्वरुपात चालत असते की, समुहाच्या प्रत्येक नवीन सदस्याच्या मनःपटलावर ही मानसिक प्रवृत्ती नोंदविली जावी. या माध्यमाद्वारेच समुह व्यक्तीचे सामाजिकरण करीत असत आणि त्याद्वारेच प्रत्येक नवीन सदस्यांच्या मानसिक आणि व्यवहारिक प्रवृत्तींचे निरुपन करीत असते. परिणामतः ती व्यक्ती संपूर्णपणे समुहावर आश्रीत झालेली असते. त्यामुळे त्या समूहाच्या मानसिक प्रवृत्तींना स्विकारावेच लागते. खरे म्हणजे ती व्यक्ती समुहावर एवढी आश्रीत झालेली असते की ती त्वरीत समुहाच्या रांगेत उभी राहते आणि समुहातील प्रचलीत श्रद्धा आणि

व्यवहारिकता रीतीरिवाज व प्रथांचा (रुढींचा) स्विकार करते. तीच त्या व्यक्तीच्या मनाची स्थायी वृत्ती बनत असते.[12]

हे अगदी स्पष्ट करण्याच्या दृष्टिने बाबासाहेबांनी ग्रोटेंनी मांडलेल्या संस्थाकरणाच्या प्रक्रियेचे विस्तृतपणे विवेचन केले आहे. याचे स्पष्टीकरण करतांना ग्रोटे असे म्हणतो की, 'मी व्यक्ती या प्रक्रियेला विरोध करुन असहमती दर्शवितो त्या व्यक्तीची घृणा, द्वेष आणि तिरस्कार करतो. या दृष्टिने ग्रोटेने सुद्धा प्रथांनाच अधिक महत्त्व दिले आहे. तो म्हणतो की प्रथा ही व्यक्तींच्या मनावर अधिराज्य निर्माण करणारी सत्ता आहे. जिवन विषयक विविध पद्धतीचे सामाजिक नियम जेव्हा प्रथा आणि पंरपरेचे रुप धारण करतात तेव्हा त्यांना समाजात लागू करण्यासाठी कोणत्याही कायद्याची आवश्यकता नसते. समुह सदैव सामुहिक कार्यवाहीद्वारे आपले सार्वभौम अधिकार प्रस्थापित करुन त्याचे उल्लंघन होणार नाही याची व्यवस्था (यंत्रणा) सुद्धा करु शकते, ही संस्थाकरणाची प्रक्रिया असते.'[13]

**संस्थाकरण आणि सामाजिक संस्था :**

या प्रक्रियेचे आकलन जरी झाले तरी ती प्रक्रिया समाजमनावर बिंबविण्याचे दायित्व कुणाचे हा प्रश्न अनुत्तरीत राहतो. अर्थातच, ते दायित्व त्या समाजातील मान्यताप्राप्त सामाजिक संस्थेचे (Social Institution) असते हे निर्विवाद सत्य आहे. त्यासाठी सर्वप्रथम सामाजिक संस्था म्हणजे काय हे समजून घेतले पाहिजे.

गर्थ आणि मील्स यांचे मते, 'सामाजिक वर्तणूकीने सातत्याने 'सामाजिक नियम' बनतात. यामुळे एका व्यक्तीने दुसऱ्या व्यक्तीच्या संबंधात जे वर्तन घडते त्याला ते 'व्यक्तीची भूमिका' असे म्हणतात व या आधारावर 'अशा भूमिकांची संघटना म्हणजे संस्था' अशी ते संस्थेची परिभाषा करतात.' रॅडक्लिफ ब्राऊन यांच्या मते, 'विशिष्ट समाज जीवनाच्या सामाजिक वर्तणूकीप्रमाणे (Standard of behaviour) म्हणजे संस्था होय.' या व्याख्येचा आशय असा की समाजरचनेत व्यक्तींची परस्पर संबंधातील कृती ही सामाजिक प्रमाण, नियम यांनी नियंत्रीत होते. त्यामुळे सामाजिक प्रमाणानुसार व्यक्तींची कृती घडावी अशी अपेक्षा ठेवली जाते.'[14] मॅकवेअर आणि पेज यांच्या मते, 'सामुहिक व्यवहाराच्या नियमांची दिशा किंवा स्थापित प्रतिमानांना (Standard) संस्था म्हणतात.' समरन यांच्या मते, 'संस्था ही एक विचारधारा आणि एका संरचनेमधून बनते.' बोगर्डस यांच्या मते, 'सामाजिक संस्था म्हणजे समाजाची अशी संरचना होय, जी प्रामुख्याने सुस्थापित विधिनियमाद्वारे मनुष्याच्या आवश्यकतांची पुर्ती करण्यासाठी संघटित केली जाते.' जे. एस. फिक्टर यांच्या मते, 'सामाजिक दृष्टिने एक स्थाई ढाचा (संरचना) असतो. ज्याला लोक आपल्या मुलभूत आणि सामाजिक गरजांची पुर्ती करण्याच्या उद्देशाने सर्वमान्य आणि सामान्य विधिनियमाद्वारे बनवितात.'[15]

'डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सामाजिक संस्थेची निश्चित अशी व्याख्या केलेली आढळत नाही. परंतु ते 'धर्म' ही संस्था आहे असे स्पष्ट म्हणतात. त्यांच्या मते हिंदु धर्म म्हणजे सामाजिक परंपरा, रितीरिवाज व प्रथा या संबंधिच्या नियमांचा संग्रह आहे आणि हे नियम व्यक्तीला सामाजिक कृती करण्यास भाग पाडतात. अशा नियमांनी हिंदु धर्म बनलेला आहे असे डॉ. बाबासाहेब आंबेउकर म्हणतात. त्याचबरोबर 'धर्म' ही संस्था आहे असेही म्हणतात. म्हणून 'सामाजिक नियमांची संघटना म्हणजे सामाजिक संस्था' अशी त्यांच्या विचारांच्या अनुषंगाने सामाजिक संस्थेची व्याख्या करता येईल.[16]

या सगळया परिभाषांचा परामर्श घेऊन सारांश रुपाने 'सामाजिक वर्तनाची व सामाजिक वर्तन ज्यापासून घडते त्या सामाजिक नियमांचे संघटन म्हणजे सामाजिक संस्था' अशी सर्वसमावेशक व्याख्या करता येईल.

समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून 'सामाजिक संस्थेचा' अन्वयार्थ स्पष्ट झााला असला तरी सामाजिक संस्थेचा समाजाच्या संस्थाकरणाशी काय संबंध आहे असा स्वाभाविक प्रश्न सहाजीकपणे निर्माण होतो. कारण संस्थाकरणाच्या प्रक्रियेत व्यक्तींच्या वर्तणुकीचे सामाजीकरण करण्यात येते आणि व्यक्तीगत वर्तणुक ही जैविक प्रेरणेशी निगडित असून ती व्यक्तीगत स्वरुपाची असते, तेव्हा संस्थेचा त्याच्याशी काय संबंध असू शकतो हा प्रश्न स्वाभाविकपणे निर्माण होतो.

रसेलच्या 'सामाजिक पुर्ननिर्माण' (Reconstruction of the society) या ग्रंथांची समिक्षा करतांना बाबासाहेबांनी या प्रश्नांची अत्यंत सुंदर रितीने उकल केली आहे. त्यात ते म्हणतात की, 'जैविक प्रेरणेचा (Impulses) संस्थेशी असणारा संबंध निःसंशय सत्य आहे.'[17] रसेलने यात असे म्हटले आहे की, ''माणसांच्या सर्व कृतींची दोन उगम स्थाने आहेत जैविक प्रेरणा व इच्छा. जैविक प्रेरणेने घडणारी माणसाची कृती इंद्रियजन्य स्वरुपाची असते. उदा. भूक लागली असता खाणे. तहान लागली असतो पाणी पिणे. या कृती संस्थेशी निगडीत नसतात. मग जैविक प्रेरणेचा (आंतरिक चेतनेचा) संस्थेशी काय संबंध असतो? तर भूक लागली असतांनाही काय खावे, कोणाच्या हातून खावे, कसे खावे, कोणासंगे खावे अशा तऱ्हेने जेव्हा वर्तणूक घडते तेव्हा त्याची कृती संस्थेशी निगडित असते. भूक लागली असतांनाही माणूस अशा नियमांनी वर्तन करतो तेव्हा ते वर्तन जिवशास्त्रीय प्रेरणेने होत नसते तर सामाजिक संस्थेमुळे होत असते''[18] याचाच अर्थ असा की, इंद्रियजन्य कृतीवर सामाजिक संस्थेचा प्रभाव असतो.

'निखळ इंद्रियजन्य कृतीला वा जैविक प्रेरणेला उद्देश नसतो. रसेलच्या मते अशा प्रेरणा आंधळया असतात. परंतु जैविक प्रेरणेचा जेव्हा संस्थेशी संबंध येतो तेव्हा त्यांना सामाजिक उद्देश प्राप्त होतो. उदा. लैंगिक प्रेरणा स्त्री–पुरुष एवढीच गोष्ट जाणते. ती बाप–मुलगी,

भाऊ–बहिण, आई–मुलगा असे नाते जाणत नसते. अत्यंत रानटी समाजात आजोबा–नात, भाऊ–बहिण, बाप–मुलगी यांच्यात लैंगिक संबंध असत. स्त्री पति व्यतिरिक्त अन्य पुरुषापासून अपत्यप्राप्ती करुन घेत असे.'[19] परंतु जैविक प्रेरणेने होणाऱ्या अशा वर्तनावर पुढे बंधने घातली गेली. म्हणजेच जैविक प्रेरणेला सामाजिक हेतु प्रदान करुन माणसाची वर्तणूक व कृती सामाजिक नियमांच्या अधिन केली गेली. विवाहाचे नियम हे जैविक प्रेरणेवर बंधने घालून तिला सामाजिक हेतू प्रदान करतात. विवाह ही संस्थाच असते व ते समाजाचे संस्थाकरण करीत असते. याचाच अर्थ असा की बाबासाहेब म्हणतात त्याप्रमाणे जैविक प्रेरणेचा संस्थेशी असणारा संबंध निःसंशय सत्य असतो. म्हणजेच समाजाचे संस्थाकरण करण्याच्या प्रक्रियेमध्ये सामाजिक संस्थेची महत्त्वपूर्ण भूमिका असते.

## सामाजिक संस्था ही काळाची गरज

काळ बदलला म्हणून सामाजिक संस्थेची उपयुक्तता कमी झाली असे नाही. सामाजिक संस्थेची उपयुक्तता कोणत्याही काळात कमी होत नाही. उलट आज समाजाची विद्यमान स्थिती पाहता सामाजिक संस्थेची कधी नव्हे एवढी आवश्यकता भासत आहे. आज कुणाचाही पायपोस कुणाच्याही हातात नाही. जो तो स्वतःला श्रेष्ठ समजून सामाजिक वर्तनाच्या नियमांना धाब्यावर बसवित आहे आणि बेशिस्त, स्वैराचार आणि अनिती दिवसेंदिवस वणव्या सारखी पसरत चालली आहे. त्यामुळे सामाजिक परिवर्तनाची चळवळ क्षीण होऊन समस्याग्रस्त झालेला आहे. त्यातूनच वैफल्यग्रस्त आणि प्रतिक्रियावादी समाजाची निर्मिती होत आहे व म्हणून नव्याने समाजाचे नियंत्रण करणारी यंत्रणा पुनःश्च क्रियान्वयित होणे ही काळाची गरज आहे. त्यासाठी नव्याने समाजाचे संस्थाकरण करणारी प्रक्रिया पूर्ववत गतिमान करण्याची आज गरज आहे व त्यासाठी आज सामाजिक संस्थेची नितांत आवश्यकता आहे.

केवळ तात्त्वीक चर्चा करुन व आंतरिक तळमळ व्यक्त करुन समाज परिवर्तनाचे कार्य पूर्णत्वास जाऊ शकत नाही. त्या दृष्टिने न्यायमुर्ती रानडे यांनी व्यक्त केलेले विचार अत्यंत मोलाचे वाटतात. त्यांच्या मते, ''नुसत्या आंतरिक तळमळीने किंवा भावनोत्कटतेने समाज सुधारेणेचे उद्दिष्ट सफल होऊ शकत नाही. अन्यायाची कितीही चीड आली तरी तेवढयानेच वास्तवातील विषमता, निर्घुणता व जुलूम, जबरदस्ती यत् किंचीतही कमी होत नाही. त्यासाठी समाजातील सुप्त शक्तींना जागृत व कार्यान्वीत करण्याची कला हस्तगत करावी लागेल. जीवनातील वेगवेगळया क्षेत्रातील प्रवृत्तींचा मागोवा घेऊन त्यांच्यात एकसुत्रीपणा आणण्याची शिकस्त करावी लागेल.''[20]

हे कार्य करण्यासाठी सामाजिक संस्थेची नितांत गरज असते. हे नव्याने सांगण्याची गरज नाही. अर्थातच, बदलत्या काळात परिस्थितीनुरुप त्या संस्थेचे स्वरुप सुद्धा बदललेले असेल, सामाजिक संस्थेच्या इतिहासाबद्दल लिहीतांना उल्हास राजझे म्हणतात की,

''सामाजिक संस्थांचा इतिहास पाहिला तर, समाजाच्या अध्यात्मिक, राजकीय, सामाजिक यासारख्या विविध क्षेत्रातल्या गरजानुसार संस्था निर्माण होतात व काही उत्तम कामगिरी बजावून नष्ट पावतात. जुन्या संस्थांची उपयुक्तता कालमानानुसार कमी होत जाणे आणि नव्या काळातील गरजांच्या भिन्न स्वरुपामुळे नव्या संस्थांची गरज निर्माण होणे हा जणू समाज जीवनातला एक नियमच आहे.''[21]

सामाजिक संस्थेची उपयुक्ततेविषयी डॉ. बाबासाहेब आंबेडकर असे म्हणतात की, ''कित्येक लोकांना असे वाटते की, तत्त्वाची माळ गोवली की आपला कार्यभाग झाला व आपण जिंकलो. पण हा भ्रम आहे. निव्वळ तत्त्वाची उभारणी करुन चालत नाही. कारण तत्त्वाची उभारणी झाल्याबरोबर त्याचा परिणाम जगाच्या राहाटीवर आपोआप होत नाही. तो परिणाम घडवून आणावा लागतो. म्हणून परिणामांच्या दृष्टिने तत्त्वे मांडण्यापेक्षा ती अमलात आणण्यासाठी योग्य अशी सामाजिक संस्था निर्माण करणे अगत्याचे आहे. जोपर्यंत संघटना तयार होत नाही तोपर्यंत त्या तत्त्वासाठी आपण झागडत आहोत ती तत्त्वे आपल्या प्रतिपक्षाला कबूल जरी असली तरी ती पुराणातील वांगी 'पुराणातच' ठेवण्यात येतील व आपले म्हणणे अरण्यारुदनाप्रमाणे शुष्क ठरेल. ज्याप्रमाणे नशीबाचा गाडा हाकण्यास यत्नसारथी असावा त्याप्रमाणे तत्त्वांचा इष्ट परिणाम घडवून आणण्यास संघटनाही असावी लागते. यावरुन पहाता मला वाटते, आपल्यात संघशक्ती उत्पन्न करण्यास आपणांस एक सर्व अस्पृश्य जातीस व्यापक अशी संस्था असणे फार जरुरीचे आहे अशी संस्था उत्पन्न झाली पाहिजे.''[22]

समाजातील सर्व क्षेत्रातील विद्यमान स्थितीवर दृष्टिक्षेप टाकला तर अत्यंत निराशाजनक स्थिती आढळून येते. आज समाजामध्ये बाबासाहेब म्हणतात त्याप्रमाणे 'बाराभाईची नगरी' निर्माण झाली आहे. कुणीच कुणाचे ऐकत नाही. त्यामुळे विघटन आणि विभाजन ही आजच्या समाजाची समस्या होऊन बसली आहे. त्यासाठी समाजाचे संस्थाकरण करुन समाजातील प्रत्येक घटकाला नियंत्रीत करण्याची कधी नव्हे एवढी गरज निर्माण झाली आहे. त्यासाठी संस्था गठीत होणे अनिवार्य आहे.

अशा प्रकारची संस्था स्थापन करण्यासाठी बाबासाहेबांनी सुशिक्षित वर्गाकडून फार मोठी अपेक्षा केली आहे. ते म्हणतात, ''यासाठी आपल्यापैकी ज्यांना ही स्थिती कळत असेल व ज्यांच्या मनात कर्तव्यबुद्धी व परोपकारीबुद्धी पूर्णपणे जागृत झाली असेल, त्यांनी आपल्या समाजाचा जीवनार्थ कलहात टिकाव लागण्यासाठी रांत्रदिवस निरपेक्ष बुद्धीने झटले पाहिजे. अशा प्रकारचे विचार समजले असून सुद्धा ते जर स्वस्थ राहात असतील, तर त्यांच्या माथ्यावर आपल्या दडपून गेलेल्या बांधवास विपन्नावस्था आणि त्यांचा नाश केल्याची भयंकर जबाबदारी येणार आहे. म्हणून सुशिक्षित बांधव हो! जर तुम्हांस इतरांकडून व पुढील संततीकडून बरे म्हणून घ्यायचे असेल व तुमची आज जी स्थिती आहे ती दूर करुन तुमच्या मुलांची व नातवंडांची

स्थिती अधिक वाईट होऊ नये अशी तुम्हास वास्तविक इच्छा असेल तर ज्या दुर्गतांची व दुराचारांनी आपल्या लोकांच्या बुद्धिचा, किर्तीचा व परिस्थितीचा घात चालविला आहे, त्यांचे यथाशक्ती निर्मूलन करणे हे आपले कर्तव्य आहे व ते आपण केले पाहिजे.'[23]

**निष्कर्ष –**

1) सुशिक्षित वर्गाने बुद्धीजीवी वर्गात परिवर्तीत होऊन व आपली जबाबदारी ओळखून समाजाचे संस्थाकरण करणारी सामाजिक संस्था उभी केली पाहिजे.

2) सामाजिक क्रांती घडवून आणण्याची जबाबदारी समाजातील बुद्धीजीवी वर्गाची आहे. सामाजिक क्रांती घडवून आणण्यासाठी एखाद्या महापुरुषाची आवश्यकता असते, हा प्रश्न जर बाजूला ठेवला तरी सामाजिक क्रांती आणण्याची जबाबदारी बुद्धीजीवी वर्गाचीच असते. हे कुणीही नाकारु शकणार नाही. कारण भविष्याकडे नजर ठेवून वर्तमानकाळात समाजाला उचीत मार्ग दाखविणे बुद्धीजीवी वर्गाचे पवित्र कर्तव्य असते आणि हे कर्तव्य ज्या समाजातील बुद्धीजीवी वर्ग पार पाडतो, तोच समाज जीवन संघर्षात टिकाव धरु शकतो.

3) सामाजिक संस्थेच्या माध्यमातून संस्थाकरणाची प्रक्रिया पूर्ण झाल्यास सामाजिक पुनःनिर्माण (Social Reconstruction) शक्य आहे.

**संदर्भ –**


1. Moon, Vasant (ed.) (1993) : *Dr. Babasaheb Ambedkar Writting and Speeches*, vol. 12, Dept. of Education, Govt. of Maharashtra, Mumbai, pp. 34.
2. तत्रैव.
3. Moon, Vasant (Ed.) (1979) : *Dr. Babasaheb Ambedkar Writting and Speeches*, vol. 1, Dept. of Education, Govt. of Maharashtra, Mumbai, pp. 485.
4. Moon, Vasant (ed.) (1990) : *Dr. Babasaheb Ambedkar Writting and Speeches*, vol. 7, Dept. of Education, Govt. of Maharashtra, Mumbai, pp. 240.
5. Moon, Vasant (Ed.) (1979) : *Dr. Babasaheb Ambedkar Writting and Speeches*, vol. 1, Dept. of Education, Govt. of Maharashtra, Mumbai, pp. 484.
6. तत्रैव.
7. Moon, Vasant (Ed.) (1991) : *Dr. Babasaheb Ambedkar Writting and Speeches*, Vol. 9, Dept. of Education, Govt. of Maharashtra, Mumbai, pp. 139.
8. उके, सुमेध (2007), समाजाचे संस्थाकरण आणि सामाजिक संस्था, *दि पीपल्स ॲडव्हाईजर*, जुलै–सप्टेंबर.
9. तत्रैव.
10. Moon, Vasant (Ed.) (1979) : *Dr. Babasaheb Ambedkar Writting and Speeches*, vol. 1, Dept. of Education, Govt. of Maharashtra, Mumbai, pp. 492.
11. Moon, Vasant (Ed.) (1987) : *Dr. Babasaheb Ambedkar Writting and Speeches*, vol. 3, Dept. of Education, Govt. of Maharashtra, Mumbai, pp. 82.

12. Moon, Vasant (Ed.) (1989) : *Dr. Babasaheb Ambedkar Writting and Speeches*, vol. 5, Dept. of Education, Govt. of Maharashtra, Mumbai, pp. 283-84.
13. उके, सुमेध (2007), समाजाचे संस्थाकरण आणि सामाजिक संस्था, *दि पीपल्स ॲडव्हाईजर*, जुलै–सप्टेंबर.
14. गायकवाड, सुधाकर (1993), डॉ. आंबेडकर यांची समाजरचनेची सैद्धांतिक मांडणी, दया पवार व इतर (संपा.), *डॉ. बाबासाहेब आंबेडकर गौरवग्रंथ*, महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, मुंबई, पृ. 7.
15. उके, सुमेध (2007), समाजाचे संस्थाकरण आणि सामाजिक संस्था, *दि पीपल्स ॲडव्हाईजर*, जुलै–सप्टेंबर.
16. तत्रैव.
17. Moon, Vasant (Ed.) (1979) : *Dr. Babasaheb Ambedkar Writting and Speeches*, vol. 1, Dept. of Education, Govt. of Maharashtra, Mumbai, pp. 492.
18. गायकवाड, सुधाकर (1993), डॉ. आंबेडकर यांची समाजरचनेची सैद्धांतिक मांडणी, दया पवार व इतर (संपा.), *डॉ. बाबासाहेब आंबेडकर गौरवग्रंथ*, महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, मुंबई, पृ. 8.
19. Moon, Vasant (Ed.) (1987) : *Dr. Babasaheb Ambedkar Writting and Speeches*, vol. 3, Dept. of Education, Govt. of Maharashtra, Mumbai, pp. 173.
20. डॉ. आंबेडकर – एक कृतिशील विचारयात्रा, पृ. 27.
21. तत्रैव.
22. नरके, हरी व इतर (संपा.) (2004), *डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे*, खंड 18, भाग 1, उच्च शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई, पृ. 21.
23. तत्रैव, पृ. 24.